# शिर्डी नगरपरिषद, शिर्डी

ता. राहाता, जि. अहिल्यानगर -४२३१०९

जावक क्र. - १४/३७३/२०२५ दिनांक: १७/०३/२०२५

## जाहिर सुचना

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 च्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने महत्वाच्या लोकसेवा व्यापक लोकहिताच्या दृष्टीने लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित करण्याबाबत त्याचप्रमाणे अधिसूचित केलेल्या लोकसेवा व अन्य बाबींचा तपशील नागरिकांना उपलब्ध करून देणेबाबत मा. शासनाने निर्देश दिले आहेत. त्याअर्थी,मा.आयुक्त तथा संचालकसो नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडील परिपत्रकानुसार नगरविकास विभाग-२ यांचेद्वारे राज्यातील नागरी स्थानिक संस्थाकरिता उक्त अधिनियम अंतर्गत एकूण ७० लोकसेवा अधिसूचित केलेल्या आहेत. पैकी शिर्डी नगरपरिषदेकडून नागरिकांना देण्यात येणाऱ्या लोकसेवांची संख्या ६६ इतकी आहे. त्याअन्वये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ च्या कलम ३ (१) अन्वये इतर अधिकारा नुसार मुख्याधिकारी, शिर्डी नगरपरिषद उक्त अध्यादेशाच्या प्रयोजनार्थ शिर्डी नगरपरिषदेकडून पुरविण्यात येत असलेल्या एकुण ६६ लोकसेवा, त्यांची आवश्यक कागदपत्रे, नियत कालमर्यादा पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणी द्वितीय अपिलीय अधिकारी यांची यादी शिर्डी नगरपरिषदेच्या दर्शनी भागावर, कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर डकविण्यात आलेली आहे; तसेच अधिकृत (https://mahaulb.in/MahaULB/index) संकेतस्थळावर अद्ययावत करण्यात आलेली आहे.

शिक्का

**(सतीश दिघे)**
प्रशासक तथा मुख्याधिकारी
शिर्डी नगरपरिषद शिर्डी

दै. पुण्यनगरी दि. १८/०३/२०२५